ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 6 | Dec - 2015

Golden Research Thoughts

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल : मानव विकास दृष्टीकोन

अनिल दत्तू देशमुख
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,उमरगा,जिल्हा - उस्मानाबाद.

अनिल दत्तू देशमुख

प्रस्तावना :-

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन पहिल्यांदाच सर्व मराठी भाषिक लोकांचे राज्य स्थापन झाले. त्यांच्यामध्ये पहिल्यांदाच राजकीय ऐक्य स्थापन झाले.[i] □ही ऐतिहासिक कारणामुळे मराठी भाषिक प्रदेश हे एकभाषी राज्याच्या संघर्षास सुरूवात होण्यापुर्वी वेगवेगळ्या प्रांतात विभागलेले होते. विदर्भाचा भूभाग मध्य प्रातांत होता. मराठवाड्याचा भूभाग हैद्राबाद संस्थानात होता, तर उर्वरित महाराष्ट्र हा मुंबई प्रांताचा भाग होता. या सर्व प्रांतात एकच व्यव्हार न केल्यामुळे या प्रदेशांच्या विकासाची पातळी भिन्न दिसून येते. व्यव्हारात त्यांचे वेगळेपण उठून दिसते[ii] त्यामुळेच सध्याच्या एकसंघ महाराष्ट्रामध्ये आजही वेगवेगळे उपप्रदेश दिसून येतात. त्यात प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश, वऱ्हाड इत्यादी प्रातांचा उल्लेख करता येईल.

एखाद्या प्रदेशातील लोकांचे जीवनमान समजून घेण्यासाठी तेथील मानव विकासाची परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. राज्याच्या प्रगतीची नेमकी परिस्थिती काय आहे, प्रगतीची नेमकी बलस्थाने कोणती, त्यातील त्रुटी कोणत्या हे परखडपणे उलगडून दाखविण्याचे कार्य मानव विकासाच्या संकल्पनेमध्ये केले जाते. जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अन्न-वस्त्र-निवारा या किमान गरजा भा□वल्यावरही शि□□-आरोग्य-रोजगार यांची प्राप्ती आणि त्यांच्यातील सातत्य, त्यांची गुणवत्ता या सर्वाबद्दलची चिकित्सा मानव विकासाच्या संकल्पनेमध्ये केली जाते. समाजातील सर्व थरांना विकासाची समान संधी मिळते किंवा नाही, विकासाचा परिघ कितपत वर्धिष्णु आहे, याचाही यात विचार केला जातो. स्त्री-पुरूष समानता, सांस्कृतिक समानता, पाणी सुरक्षित पर्यावरण अशा घटकांकडे विशेष लक्ष दिले तरच विकासाची गुणवत्ता कळण्यास मदत होते, यावर यात भर दिला जातो. अशा सर्व निरीक्षणानंतर भविष्यात नेमक्या कोणत्या बाबीवर लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे, त्याचे निर्देशनही यातून धोरण निर्धारकांना मिळत असते.

हा शोधनिबंध तीन भागात विभागला आहे. पहिल्या भागात प्रास्ताविकपर प्रकरणात मानवी विकासाची सं□ल्प-ना, व्याप्ती व उद्येश थोडक्यात स्पष्ट केला आहे. तर दुसऱ्या भागात मानव विकास निर्देशांकाची मापणाची पध्दती स्पष्ट केली आहे. तर तिसऱ्या भागात महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांकांनुसार तुलनात्मक स्थिती स्पष्ट केली आहे.

२. मा-व वि□ास संकल्पनेचा अर्थ :-

मानव विकास म्हणजे अशा वातावरणाची निर्मिती, ज्यामध्ये व्यक्तींना त्यांच्या क्षमता विकसित करता येतील, त्यांच्या गरजा व इच्छेनुसार सर्जनशिल व फलदायी आयुष्य जगता येईल तसेच समाज कल्याणाकरिता निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल. मानव विकास मापणासाठी महत्वाचे मानदंड सातत्याने सुधारित होत आहेत.[iii] संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने १९९७ मध्ये प्रसिध्द केलेल्या

मानव विकास अहवालात ही संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे, 'मानव विकास म्हणजे जनतेच्या कल्याणाचा उच्च स्तर साध्य करून त्यांच्या निवडीची प्रक्रिया निश्चित करणे होय. हाच मानव विकास संकल्पनेचा गाभा होय. त्यापैकी जनतेला अत्यावश्यक असणाऱ्या निवडक म्हणजे दीर्घ व निरोगी जीवन ज्ञानाची उपलब्धता व उत्तम जीवनमान हवे असणारे उत्पन्न होय.'[iv]

भारतीय राज्यघटनेमध्ये या संबंधात आवश्यक तरतुद करण्यात आलेली आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अन्वये प्रत्येक व्यक्तीस जीवन जगण्याचा मौलिक अधिकार दे□यात आला आहे. या अनुच्छेदाच्या अनुषंगाने देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनेक निर्णयांमध्ये असे स्पष्ट केलेले आहे की, अनुच्छेद २१ मधील जीवन (Life) या शब्दाचा अर्थ 'क्लिनिकल जीव-न' (Clinical Life) इतकाच मर्यादित नसुन तो व्यापक स्वरूपाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मते, 'जीवन जगणे म्हणजे समाधानाचे, आत्म सन्मानाचे आणि स्वाभिमानाचे जीवन जगणे होय.' ही बाब विचारात घेता राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ मध्ये 'मानव विकास' ही संकल्पना अंतर्भुत आहे. त्यासोबतच भारतीय राज्यघटनेच्या भाग तीन मध्ये नमुद करण्यात आलेल्या सर्वच मुलभुत अधिकार व भाग चार मधील कांही मार्गदर्शक तत्वांचा अंतर्भाव मानव विकास या संकल्पनेत करण्यात आला आहे.[v]

३.मा-नव वि□ास संकल्पनेचा विकास :-

मानव विकासाच्या संकल्पनेमध्ये विकासाच्या संकल्पनेची व्याप्ती केवळ आर्थिक दृष्टीने न पाहता सामाजि□, आर्थिक, शैक्षणिक पैलूतून स्पष्ट करण्यात आली आहे. मानव विकासाच्या संकल्पनेमध्ये व्यक्तीला केंद्रस्थानी मानले जाते. मानव विकासात मनुष्याच्या क्षमतांचा विकास अभिप्रेत आहे. मानव विकासाच्या संकल्पनेत राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याची संकल्पना अभिप्रेत आहे. त्याशिवाय व्यक्तीला स्वाभिमानाने जगता येऊन त्यांना मानवी हक्कांची हमी मिळाली पाहिजे हेही अभिप्रेत आहे. मा-नव वि□ास नि-देशां□ ही सं□ल्प-ना इ.स. १९९० च्या आसपास अस्तित्वात आली. मानवी जीवनाचा विकास मोजण्यासाठी मानव विकास निर्देशांकाचा वापर केला जातो. मानव विकास निर्देशांक विकसित करण्याचे श्रेय पाकिस्तानातील अर्थतज्ञ डॉ. महेबूब उल हक व भारताचे अर्थशास्त्राचे नोबल पारितोषिक विजेते प्रा. अमर्त्य सेन यांना दिले जाते. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (UNDP) ही संस्था जगातील देशांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द करीत असते. केंद्रीय नियोजन मंडळ भारतातील राज्यांचे मानव विकास निर्देशांक प्रकाशित करते. महाराष्ट्र शासनाने यू. एन. डी. पी. व केंद्रीय नियोजन मंडळाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक प्रसिध्द केले आहेत.

युएनडीपीने मार्च २०१३ मध्ये प्रकाशित केलेल्या मानव विकास अहवालात १८५ देशांची मानव विकास निर्देशां□ा-नुसार अतिउच्च विकसित, उच्च विकसित, मध्यम विकसित व अल्प विकसित अशी वर्गवारी केली आहे. या यादीत नॉर्वो हा देश प्रथम क्रंमांकावर असून त्याचा मानव विकास निर्देशांक ०.९५५ इतका आहे. भारताचा क्रं. १३६ असून निर्देशांक ०.५५४ इतका आहे.

४.मानव विकास निर्देशांक मापनाची पध्दती

मानव विकास ही संकल्पना फार व्यापक आहे. परंतु मानव विकास निर्देशांक काढण्याकरिता १) दरडोई उत्पन्न, २) आरोग्य, व ३) शिक्षण या तीन निकषांचा आधार घेतला जातो. यु. एन. डी. पी. ने मानव विकास निर्देशांक तयार करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती स्वीकारली आहे.

१) सरासरी आयुष्यमान ज्यामुळे जनतेच्या आरोग्य व निरोगी जीवनाची कल्पना येते.
२) ज्ञान ज्यमध्ये देशाच्या प्रौढ साक्षरतेचे प्रमाण आणि देशात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे प्रमा□.
३) देशाचे दरडोई उत्पन्न.

वरील तीन्ही चल घटकांना समान भारांक देऊन त्यावरून एकत्रित मानव विकास निर्देशांक काढला जातो. हा निर्देशांक काढण्यासाठी यु. एन. डी. पी. या संस्थेने वरील प्रत्येक चल घटकांसाठी कमाल व किमान मुल्ये निश्चित केली आहेत. २०१४ च्या मानव विकास अहवालामध्ये यु. एन.डी. पी. ने चलघटक व त्यांचे किमान व कमाल मुल्ये खालीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

तक्ता क्रं. १

मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी चलघटकांनुसार निश्चित केलेली किमान व कमाल मुल्ये

अ.क्रं.	परिमा□	चल घटक	f□मा-न मुल्ये	□माल मुल्ये
१	आरोग्य	अपेक्षित आयु मर्यादा (वर्ष)	२०	८५

२	शि□□	अपेक्षित शिक्षण (वर्ष)	०	१८
		सरासरी शि□□ (वर्ष)	०	१५
३	राहणीमानाचा दर्जा	सकल राष्ट्रीय दरडोई उत्पन्न (PPP 2011 $)	१००	७५,०००

स्त्रोत :- http://hrd.undp.org

वरील तक्ता क्रं. १ मध्ये मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी निश्चित केलेले परिमाण, त्यांचे चल घटक व या चल घटकांचे किमान व कमाल मुल्ये यांची माहिती दर्शविण्यात आली आहे. यावरून आपणाला हे दिसून येते की, आरोग्य या परिमाणासाठी अपेक्षित आयुमर्यादा हा चल घटक निश्चित केला आहे. अगोदर आयुर्मान काढण्यासाठी ० हे किमान मुल्य होते, पण मागील अनुभवावरून आता हे किमान मुल्य २० वर्ष व □माल मुल्ये हे ८५ वर्ष इतके निश्चित करण्यात आले आहे. शिक्षण या परिमाणासाठी अपेक्षित शिक्षण या चलघटकासाठी किमान मुल्ये हे ० इतके असून कमाल मुल्य हे १८ वर्ष इतके म्हणजे संबधित देशातील पदव्युत्तर शिक्षण असे निश्चित केले आहे, तर सरासरी शिक्षण या चलघटकासाठी किमान मुल्ये हे ० इतके व कमाल मुल्य हे १५ वर्ष इतके निश्चित केले आहे. संबधित देशामधील राहणीमानाचा दर्जा समजण्यासाठी चल घटक म्हणून राष्ट्रीय दरडोई उत्पन्न (२०११ च्या चालू किंमतीनुसार अमेरिकन डॉलरमध्ये) विचारात घेण्यात आले आहे व त्यासाठी किमान मुल्य हे १०० अमेरिकन डॉलर व कमाल मुल्ये हे ७५,००० अमेरिकन डॉलर इतके गृहित धरले आहे.

प्रत्येक देशाच्या संदर्भात वरील तीन चल घटकांच्या सहाय्याने खालील सुत्राच्या आधारे प्रत्येक चल घटकाचा स्वतंत्र निर्देशांक काढला जातो. व नंतर या तिन्हीची साधी सरासरी म्हणजेच मानव विकास निर्देशांक समजला जातो.

चल घटक निर्देशांक = प्रत्यक्ष मुल्य - f□मा-न मुल्य / □माल मुल्य - f□मा-न मुल्य

५.महाराष्ट्रातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक

मानव विकास निर्देशांक हे संबधित प्रदेशातील सामाजिक-आर्थिक विकासाचे व्यापक निर्देशक आहे. महाराष्ट्र शासनाने आजपर्यंत महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ व 'महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२' असे दोन मानव विकास अहवाल प्रकाशित केले आहेत. यामध्ये २००२ साली प्रकाशित केलेल्या मानव विकास अहवालामध्ये १) अर्भक मृत्यूदराच्या स्वरूपात आयुर्मान २) साक्षरता दर व शिक्षणाची सरासरी वर्ष यांच्या स्वरूपात ज्ञान व ३) दरडोई जिल्हा उत्पन्नाच्या स्वरूपात आर्थिक साध्यता या निर्देशकांचा वापर करून राज्याचा जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक काढण्यात आला. २०१४ साली प्रकाशित झालेल्या 'महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२' या अहवालात १) अर्भक मृत्यूदराच्या स्वरूपात आयुर्मान (IMR)२) साक्षरता दर व हजेरीपटावरील विद्यार्थ्यांची नावनोंदणी (TLR & GER) ३) दरडोई जिल्हा घरगुती उत्पादन (PCDDP) यांच्या स्वरूपात आर्थिक साध्यता यांचा वापर करून राज्याचा जिल्हानिहाय मानव वि□ास निर्देशांक काढण्यात आला. खालील तक्ता क्रं. २ मध्ये २००१ व २०११ या सालातील महाराष्ट्रातील जिल्हानिहाय मानव वि□ास निर्देशां□ हे त्याच्या विभाग व वर्गवारीसह दर्शविण्यात आले आहेत.

तक्ता □. २

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २००१ व २०११

राज्यातील □म	जिल्हा	मानव वि□ास निर्देशां□ २००१ (HDI)	राज्यातील □म	जिल्हा	मानव वि□ास निर्देशां□ २०११ (HDI)	व□वारी
A	**B**	**C**	**D**	**E**	**F**	**G**
१	मुंबई (ROM)	०.७५६	१	मुंबई (ROM)	०.८४१	अति उच्च स्तर
२	पु□ (ROM)	०.७२२	२	पु□ (ROM)	०.८१४	
३	ठाणे (ROM)	०.७२१	३	ठाणे (ROM)	०.८००	
४	रायगड (ROM)	०.७१७	४	ना□पूर (V)	०.७८६	
५	ना□पूर (V)	०.६९१	५	□ोल्हापूर (ROM)	०.७७०	
६	□ोल्हापूर (ROM)	०.६७८	६	रायगड (ROM)	०.७५९	

७	सांली (ROM)	०.६७०	७	सिंधुदु (ROM)	०.७५३	
८	सिंधुदु (ROM)	०.६६७	८	-नाशि (ROM)	०.७४६	
९	सातारा (ROM)	०.६६१	९	सांली (ROM)	०.७४२	
			१०	सातारा (ROM)	०.७४२	
१०	-नाशि (ROM)	०.६५२	११	रत्नागिरी (ROM)	०.७३२	उच्च स्तर
११	औरंगाबाद (M)	०.६५०	१२	सोलापूर (ROM)	०.७२८	
१२	चुद्रपूर (V)	०.६३७	१३	औरंगाबाद (M)	०.७२७	
१३	वर्धा (V)	०.६३४	१४	जळगाव (ROM)	०.७२३	
१४	अमरावती (V)	०.६३३	१५	वर्धा (V)	०.७२३	
१५	अकोला (V)	०.६३१	१६	अकोला (V)	०.७२२	
१६	रत्नागिरी (ROM)	०.६२९	१७	अहमदनगर (ROM)	०.७२०	
१७	अहमदनगर (ROM)	०.६२६				
१८	सोलापूर (ROM)	०.६२४	१८	चंद्रपूर (V)	०.७१८	मध्यम स्तर
१९	जळगाव (ROM)	०.६२४	१९	भंडारा (V)	०.७१८	
२०	भंडारा (V)	०.६२३	२०	अमरावती (V)	०.७०१	
२१	दिया (V)	०.६१७	२१	दिया (V)	०.७०१	
२२	बीड (M)	०.६०६	२२	यवतमाळ (V)	०.७००	
२३	लातूर (M)	०.५९५	२३	बुलढाण (V)	०.९८४	
२४	यवतमाळ (V)	०.५९२	२४	परभ (M)	०.६८३	
२५	उस्मानाबाद (M)	०.५८८	२५	बीड (M)	०.६७८	
२६	धुळे (ROM)	०.५७९	२६	धुळे (ROM)	०.६७१	निम्न स्तर
२७	परभ (M)	०.५७८	२७	लातूर (M)	०.६६३	
२८	भंडारा (V)	०.५६७	२८	जालना (M)	०.६६३	
२९	हिंली (M)	०.५६१	२९	नांदेड (M)	०.६५७	
३०	नांदेड (M)	५५८	३०	उस्मानाबाद (M)	०.६४९	
३१	वाशिम (V)	०.५५४	३१	हिंली (M)	०.६४८	
३२	जालना (M)	०.५५४	३२	वाशिम (V)	०.६४६	
३३	डचिरोली (V)	०.५३८	३३	डचिरोली (V)	०.६०८	
३४	-ंदूरबार (ROM)	०.५१३	३४	-ंदूरबार (ROM)	०.६०४	
	महाराष्ट्र	०.६६६		महाराष्ट्र	०.७५२	

टीप :- १) ROM = उर्वरित महाराष्ट्र, M = मराठवाडा, V = विदर्भ.

२) मुंबई व मुंबई उपनगर यांचा समावेश एकत्र केला आहे.

स्त्रोत :- महाराष्ट्र मानव विकास अहवाल इ २०१२, तक्ता क्रं. २.२, पृष्ठ क्रं. १४.

वरील तक्ता क्रं. २ मधील माहितीनुसार आपणाला असे दिसून येते की, महाराष्ट्रातील मानव विकासाचा विचार केल्यास सन २००२ मध्ये महाराष्ट्राचा सरासरी मानव विकास निर्देशांक हा ०.६६६ इतका होता, तर सन २०११ मध्ये ०.७५२ इतका आहे. याचा जिल्हानिहाय विचार ल्यास या दोन्ही वर्षी महाराष्ट्रामध्ये मुंबई व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक हा सर्वाधिक आहे. तो सन २००२ या वर्षी ०.७५६ इतका तर सन २०११ मध्ये ०.८४१ इतका आहे, तसेच वरील दोन्ही वर्षात महाराष्ट्रात सर्वात कमी मा-व विास निर्देशां हा नंदूरबार जिल्ह्याचा सन २००२ मध्ये ०.५१३ इतका तर सन २०१२ मध्ये ०.६०४ इतका आहे. वरील माहितीवरून आपणाला असे दिसून येते , सन २००२ व सन २०१२ या दोन वर्षी महाराष्ट्राने आपले मानव विकास अहवाल प्रसिध्द केले आहेत. मानव विकास वाढीच्या दृष्टीने अनेक योजना आखण्यात आल्या मात्र दहा वर्षाच्या कालावधीमध्ये विकासाच्या बाबतीत तितकासा फरक झाल्याचे दिसून येत नाही खालील तक्ता क्रं. ४.२० मध्ये सन २००२ व सन २०११ या दोन्ही वर्षातील मानव विकासाची महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय वर्गवारीनुसार जिल्ह्यांची संख्या यांची माहिती दर्शविली आहे.

तक्ता क्रं. ३
महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय मानव विकासाच्या वर्गवारीनुसार जिल्ह्यांची संख्या

अ.क्रं.	व□वारी	मराठवाडा		विदर्भ		उर्वरित महाराष्ट्र		एकुण	
		२००२	२०११	२००२	२०११	२००२	२०११	२००२	२०११
१	अति उच्च मानव विकास जिल्हे	--	--	०१	०१	०८	०९	०९	१०
२	उच्च मानव विकास जिल्हे	०१	०१	०४	०२	०३	०४	०८	०७
३	मध्यम मा-नव वि□ास जिल्हे	०३	०२	०३	०६	०२	--	०८	०८
४	निम्न मा-नव वि□ास जिल्हे	०४	०५	०३	०२	०२	०२	०९	०९
	एकुण	**०८**		**११**		**१५**		**३४**	

स्त्रोत :- तक्ता क्रं. २

वरील तक्ता क्रं. ३ मध्ये महाराष्ट्रातील जिल्ह्यांची सन २००२ व सन २०११ या वर्षातील मानव विकास निर्देशां□ा-नुसार व□वारी दर्शविली आहे. यामध्ये सन २००२ या वर्षाचा विचार केल्यास अति उच्च स्तर मानव विकास निर्देशांक या वर्गामध्ये महाराष्ट्रातील एकुण नऊ जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यातील आठ जिल्हे हे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील आहेत, तर एक जिल्हा हा विदर्भ प्रदेशातील आहे. महाराष्ट्रामध्ये उच्च स्तर मानव विकास निर्देशांक असणारे एकुण आठ जिल्हे आहेत. त्यात मराठवाडा प्रदेशातील एक, विदर्भ प्रदेशातील चार, तर उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. मध्यम मानव विकास निर्देशांक असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये एकुण आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यात मराठवाडा प्रदेशातील तीन, विदर्भ प्रदेशातील तीन व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील दोन जिल्ह्यांचा समावेश होतो. निम्न स्तर मानव विकास निर्देशांक असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये एकुण नऊ जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यात प्रदेशनिहाय विचार केल्यास मराठवाडा प्रदेशातील चार, विदर्भ प्रदेशातील तीन व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील दोन जिल्ह्यांचा समावेश होतो.

मानव विकास निर्देशांकानुसार सन २०११ या वर्षातील महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा वर्गवारीनुसार प्रदेशनिहाय विचार केल्यास आपणाला असे दिसून येते की, अति उच्च स्तर मानव विकास निर्देशांक या वर्गामध्ये एकुण दहा जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यातील नऊ जिल्हे हे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील आहेत, तर एक जिल्हा हा विदर्भ प्रदेशातील आहे. उच्च स्तर मानव विकास निर्देशांक असलेले एकुण सात जिल्हे आहेत. त्याचा प्रदेशनिहाय विचार केल्यास त्यात मराठवाडा प्रदेशातील एक, विदर्भ प्रदेशातील दोन व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील चार जिल्ह्यांचा समावेश होतो. मध्यम मानव विकास निर्देशांक असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये एकुण आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. त्याचा प्रदेशनिहाय विचार □ल्यास असे दिसून येते की, त्यात मराठवाडा प्रदेशातील दोन जिल्हे व विदर्भ प्रदेशातील सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. निम्न स्तर मानव विकास असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये एकुण नऊ जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यात मराठवाडा प्रदेशातील पाच जिल्हे, विदर्भ प्रदेशातील दोन जिल्हे आणि उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील दोन जिल्ह्यांचा समावेश होतो.

एखाद्या प्रदेशातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक जास्त असणे म्हणजे तेथे सामाजिक-आर्थिक विकास चांगला असणे होय, आणि एखाद्या प्रदेशातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक □मी असणे म्हणजे त्या जिल्ह्यातील लोकांची समाजिक-आर्थिक परिस्थिती बिकट असणे होय. आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने दोन मानव विकास अहवाल प्रसिध्द केले आहेत. या अहवालातील माहितीवरून आपण सन २००२ व सन २०११ या दोन वर्षातील मानव विकास निर्देशांकाचा प्रदेश व जिल्हानिहाय विचार केल्यास असे दिसून येते की, वरील दहा वर्षाच्या □ालावधीमध्ये महाराष्ट्रातील मानव विकासाच्या बाबतीत विषमता अधिकच वाढली आहे.

वरील तक्ता क्रं. २ मधील माहितीवरून हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत असणारी विषमता ही फार अधिक आहे. सन २०११ मधील महाराष्ट्राचा सरासरी मानव विकास निर्देशांक हा ०.७५२ इतका आहे. महाराष्ट्रातील एकुण ३५ जिल्ह्यांपैकी २७ जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक हा राज्याच्या सरासरी निर्देशांकापेक्षा कमी आहे व फक्त ८ जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक हा राज्य सरासरीच्या वर आहे. या आठ जिल्ह्यांपैकी सात जिल्हे हे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील आहेत व एक जिल्हा हा विदर्भ प्रदेशातील आहे. या

जिल्ह्यांमध्ये मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे, नागपूर, कोल्हापूर, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, राज्यातील जवळ जवळ ७५ टक्के जिल्हे हे राज्य सरासरीच्या खाली आहेत.

देशाचा विचार करता ही परिस्थिती बरीच वेगळी आहे. एकुण २२ राज्यापैकी आठ राज्यांचा मानव विकास निर्देशांक हा देशाच्या सरासरी निर्देशांकापेक्षा कमी आहे व १४ राज्यांचा मानव विकास निर्देशांक हा देशाच्या सरसरी निर्देशांकापेक्षा अधिक दिसून येतो[vi]. म्हणजेच देशाच्या पातळीवरून ही विभागणी साधारणत: ६०:४० टक्के अशी झालेली दिसून येते, परंतु महाराष्ट्रात मात्र ही विभागणी २५:७५ टक्के अशी झालेली आहे. म्हणजेच मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत महाराष्ट्रातील २५ टक्के जिल्हे राज्य सरासरीच्या वर असून ७५ टक्के जिल्हे हे राज्य सरासरीच्या खाली आहेत. त्यातही मराठवाड्यातील जिल्हे हे खूपच खाली असलेले दिसून येतात.

६.उपाय-योजना :-

मानवी जीवनाचा विकास मोजण्यासाठी मानव विकास निर्देशांकाचा विचार केला जातो. मानव विकास ही सं□ल्प-ना फार व्याप□ आहे. परंतु मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी मात्र १) दरडोई उत्पन्न २) आरोग्य व ३) शिक्षण या तीन बाबींचा प्रामुख्याने विचार केला जातो. माणूस म्हणून जीवन जगण्यासाठी या तीनही बाबी आवश्यक आहेत. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील मानव विकासाबाबत जिल्हानिहाय व प्रदेशनिहाय असमतोल दूर करण्यासाठी खालील कांही उपाय सांगता येतील.

१. □मी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये लोकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी औद्योगिकरणाच्या क्षेत्राचा विस्तार झाला पाहिजे. त्याकरिता मागास प्रदेश, जिल्ह्यांमध्ये उद्योग उभारणीसाठी पायाभूत सुविधा उपल्बध करून देणे, त्यसाठी सवलती व प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.
२. □ामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी कृषी विकासावर भर दिला पाहिजे. त्यासाठी शेतीला मुबलक सिंचनाबरोबरच शेतीपूरक उद्योग कुक्कुट पालन, इमू पालन, शेळी पालन, वऱ्हापालन अशा शेतीपूरक उद्योग निर्मितीस शासनाने सहकार्य व प्रात्साहन देणे गरजेचे आहे. तसेच तुती लागवड, फलोत्पादन, शेतीमाल प्रक्रिया उद्योग निर्मितीस चालना दिली पाहिजे.
३. मागास भागात सर्व प्रकाराच्या दर्जदार शिक्षणाच्या सोयी उपल्बध करून दिल्या पाहिजेत.
४. शासनाने अर्भक मृत्यु दर, माता मृत्यु दराचे प्रमाण कमी करण्यासाठी दर्जेदार व मुबलक प्रमाणात आरोग्य सोयी उपल्बध करून दिल्या पाहिजेत. तसेच बालविवाह थांबविण्यासाठी सामाजिक जागृती निर्माण केली पाहिजे.
५. शासनाने सर्व प्रकारच्या विकास योजनांची अंम्मलबजावणी करताना मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या प्रदेश, जिल्ह्यांना प्राधा-य देणे गरजेचे आहे.

७.सारांश :-

मानव विकास निर्देशांक हे संबधित प्रदेशातील सामाजिक-आर्थिक विकासाचे व्यापक निर्देशक आहे. एखाद्या प्रदेशातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक जास्त असणे म्हणजे तेथे सामाजिक-आर्थिक विकास चांगला आहे असे समजले जाते. अलिकडेच २०१४ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०११' प्रसिध्द केला आहे. या अहवालातील माहितीनुसार मानव विकासाच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात असमतोल दिसून येतो. मानवतेच्या दृष्टीने मानव विकास निर्देशांकामधील ही तफावत चांगली नाही. त्यासाठी शासनाने राज्यातील सर्व जनतेला किमान जीवनमान उपल्बध होईल अशी योजना आखली पाहिजे. जेणेकरून राज्यातील सर्व भागातील जनतेत ऐक्य निर्माण होईल.

---

[i] प्रा. डॉ. आशोक चौसाळकर, महाराष्ट्राचे राजकारण (लेख), नवभारत (त्रैमासिक), प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, सातारा, मे-जुन २०१०, पृष्ठ क्रं. ४.

[ii] □ॉ. ए. बी. वर्धन, अजुन संघर्ष संपलेला नाही (लेख), लोकराज्य, सुवर्ण महात्सवी महाराष्ट्र विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, एप्रिल-मे २०१०, पृष्ठ क्रं. १६.

[iii] महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१३-१४, पृष्ठ क्रं.२२९.

[iv] प्रा. उत्तम वाकोडकर, प्रा. दिपक पालमकर, महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक (लेख), संपादक, प्राचार्य डॉ. भारत हांडीबाग, स्मरणिका, मराठवाडा जनता विकास परिषद, सहावे अधिवेशन, आंबेजोगाई , २०१०, पृष्ठ क्रं.

[v] □ष्णा भोगे, महाराष्ट्र व मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक (एक चिकित्सा व भविष्य दिशा), महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव सिंहावलोकन परिषद व संशोधन प्रकल्प, औरंगाबाद, जुलै २०१०, पृष्ठ क्रं. १७-१८.

[vi] महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१३-१४, पृष्ठ क्रं. २२८.